


'आशा दी होप' या चित्रफितीचे प्रकाशन करताना सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ, आरोग्यमंत्री डॉ. विमल मुंदडा, कमलेश अग्रवाल, निर्मल सूर्या आणि बी. एस. सिंघाल.

# 'आशा दी होप : आकडी येणाऱ्यांसाठी दिशादर्शक'

**मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी)** - आकडी आलेल्या व्यक्तीवर करण्यात येणाऱ्या उपचारांबाबत अनेक गैरसमजुती जनतेच्या मनामध्ये आहेत. अनेक व्यक्ती यामुळे अंधश्रद्धेचे बळी ठरतात; परंतु या आजाराबाबत जनतेमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आलेली 'आशा दी होप' ही चित्रफीत मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ यांनी येथे व्यक्त केला.

जागतिक आकडी (एपेलॅप्सीक) दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी आरोग्यमंत्री विमल मुंदडा, डॉ. निर्मल सूर्या आदी उपस्थित होते.

'आशा दी होप' ही चित्रफीत आकडी येणाऱ्यांसाठी दिशादर्शक ठरणार आहे. यापूर्वी आकडी येणाऱ्या व्यक्ती आजार दूर करण्यासाठी चुकीच्या रस्त्याचा वापर करी. अनेक व्यक्ती अंधश्रद्धेच्या आहारीही जात. त्यावर लाखो रुपये खर्च करतात. असे करताना त्यांचा आजार बरा होण्याऐवजी अधिक बळावतो, त्यामुळे लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी तयार करण्यात आलेली ही चित्रफीत एक दिशादर्शकाचे काम करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या आजारग्रस्त रुग्णांच्या कुटुंबियांना अनेक संकटांचा सामना करावा लागतो. शहराबरोबरच ग्रामीण भागापर्यंत ही चित्रफीत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन आरोग्यमंत्री विमल मुंदडा यांनी या वेळी दिले.

या चित्रफितीच प्रकाशन छगन भुजबळ व विमल मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले.

या चित्रफितीत डॉ. निर्मल सूर्या आणि डॉ. संगीता सूर्या यांनी काम केले असून, डॉक्युमेंटरीची निर्मिती मंजुल कपूर यांनी केली आहे.